**मा.ना.श्री नवाब मलिक, मंत्री अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उदयोजकता, तथा पालकमंत्री परभणी जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 09.01.2022 रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा.ना.श्री नवाब मलिक, मंत्री अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उदयोजकता, म.रा. तथा पालकमंत्री परभणी जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक दुरदृश्य प्रणालीच्या (Video Conference) माध्यमातुन संपन्न झाली. प्रस्तुत बैठकीस मा. श्रीमती निर्मलाताई विटेकर, अध्यक्षा जिल्हा परीषद. परभणी, मा. खा.श्रीमती फौजीया खान, राज्यसभा सदस्य, मा.खा.श्री संजय जाधव, लोकसभा सदस्य, परभणी, मा.आ.श्री.विक्रम वसंतराव काळे विधान परीषद सदस्य, मा.आ.श्री.बाबाजानी दुर्राणी, विधान परीषद सदस्य, मा.आ.श्री विप्लव बाजोरीया, विधान परीषद सदस्य, मा.आ.श्री सुरेश वरपुडकर, विधानसभा सदस्य, पाथरी, मा.आ.श्री राहुल पाटील, विधानसभा सदस्य, परभणी, मा.आ.श्रीमती मेघनाताई बोर्डीकर, विधानसभा सदस्य, जिंतुर, मा.आ.श्री रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य, गंगाखेड, तसेच सर्व जिल्हा नियोजन समितीचे सर्व सन्माननीय नामनिर्देशित व निर्वाचित सदस्य तसेच विशेष निमंत्रीत सदस्य, श्रीमती आंचल गोयल, जिल्हाधिकारी परभणी, श्री.शिवानंद टाकसाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, परभणी, श्री. जयंत मिना, पोलीस अधिक्षक, परभणी, श्री. देविदास पवार, आयुक्त परभणी शहर महानगर पालीका तसेच जिल्हयातील वरिष्ठ अधिकारी व कार्यान्वयीन यंत्रणांचे प्रमुख दुरदृश्य प्रणालीच्या (Video Conference) माध्यमातुन उपस्थित होते.

बैठकीचे सुरुवातीस मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांनी मा.पालकमंत्री महोदयांचे शब्दसुमनाने स्वागत करुन बैठकीस उपस्थित मा.खासदार, मा.आमदार सर्व सन्माननीय नामनिर्देशित व निर्वाचित सदस्य तसेच विशेष निमंत्रीत यांचेही शब्दसुमनांनी स्वागत केले.

तदनंतर मा. पालकमंत्री महोदयांनी प्रथम सन 2022-23 चा प्रस्तावीत आराखडा संक्षीप्त स्वरुपात सभागृहास सांगावा, त्यानंतर मागील बैठकीतील मुद्यांच्या कार्यपालन अहवालावर चर्चा होईल व त्यानंतर सन 2021-22 वार्षिक योजनेतील खर्चाविषयी चर्चा करण्यात येईल असे निर्देशित केले.

जिल्हा नियोजन अधिकारी, परभणी यांनी सन 2022-23 चा प्रस्तावीत प्रारुप आराखडा हा रू.18642.90 लक्ष रक्कमेचा तयार करण्यात आला असल्याचे सांगुन त्यापैकी रू.11434.31 लक्ष एवढी तरतुद गाभाक्षेत्रासाठी तर रू.5717.16 लक्ष एवढी तरतुद बिगर गाभाक्षेत्रासाठी करण्यात आली असुन नाविन्यपुर्ण योजना व इतर करिता 5% निधी रु.932.14 लक्ष व महिला व बालविकास चिन्हांकित राखीव निधी रु.559.29 लक्ष प्रस्तावित करण्यात आला असल्याचे सांगितले.

यावर मा.जिल्हाधिकारी यांनी सदरील आराखड्याबाबत कोणाच्या काही सुचना असल्यास सांगण्याची विनंती केली.

त्यावर मा.खा.श्री संजय जाधव, लोकसभा सदस्य,परभणी यांनी आराखड्यामध्ये शिर्षनिहाय तरतुदी बाबत नमुद केले असल्यामुळे आराखड्याला मान्यता देण्यास हरकत नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.खा.श्रीमती फौजीया खान, राज्यसभा सदस्य, यांनी कार्यकारी समितीच्या बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यांची आठवण दिली असता मा. जिल्हाधिकारी यांनी वाढीव निधीस मंजुरी मिळाल्यानंतर आराखड्यात आपल्या सुचनांनुसार बदल करण्यात येईल असे सांगितले.

मा.आ.श्री रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य, गंगाखेड यांनी प्रस्तावीत आराखड्यामध्ये स्मशानभुमी व शाळांसाठी काय तरतुद केली? अशी विचारणा केली. त्यांचे मतदार संघामध्ये 175 गावात स्मशानभुमी नाहीत व शाळा मोडकळीला आल्या आहेत असे सांगितले.

त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी नवीन शाळा इमारतींसाठी रू.4.00 कोटी निधीची तरतुद करण्यात आली असल्याचे सांगितले. जिल्हा परीषदेची शाळांच्या बांधकामांसाठी जास्त निधीची मागणी आहे परंतु उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत या शिर्षाखाली तरतुद करण्यात आली असल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

त्यावर मा. आमदार श्री. सुरेश वरपुडकर, विधानसभा सदस्य, पाथरी यांनी निजामकालीन शाळांच्या दुरुस्तीसाठी योजना आहे त्यामध्ये काही तरतुद केली आहे काय? याबाबत विचारणा केली.

त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी अशा शाळांची यादी शासनास सादर करण्यात आली असल्याचे सांगितले.

शाळांचे बांधकाम दुरुस्तीसाठी निधी वाटप करताना शाळांचा प्राधान्यक्रम यादी निश्चीत केली पाहीजे असे मा.आ.श्रीमती मेघनाताई बोर्डीकर, विधानसभा सदस्य, जिंतूर यांनी सांगितले.

मा.आ.श्री बाबाजानी दुर्राणी, विधान परिषद सदस्य, यांनी असा प्राधान्यक्रम जिल्हा परीषदेने निश्चीत केला पाहीजे असे सांगितले. तसेच दलीत वस्तीमधील निधी वितरणामध्ये देखील कमी दलीतवस्ती असलेल्या गावांना जादा निधी व जादा दलीतवस्ती असलेल्या गावांसाठी कमी निधीची तरतुद केली जाते असे सांगण्यात आले.

जनसुविधा मध्ये स्मशानभुमीसाठी काय तरतुद केली याबाबत मा.आ.श्री रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य, यांनी विचारणा केली असता रू.10.00 कोटीची तरतुद करण्यात आली असल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. ही तरतुद गतवर्षीपेक्षा कमी असल्याचे सांगून मा.आ.श्री रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य यांनी सांगितल्यावरुन मा.जिल्हाधिकारी यांनी चालु वर्षीच्या आराखडयाची मर्यादा ही गतवर्षीच्या आराखड्यापेक्षा जवळपास रू.39.00 कोटीने कमी असल्यामुळे त्या प्रमाणात कमी तरतुद करण्यात आली असल्याचे सांगितले. जर वाढीव तरतुद उपलब्ध झाल्यास आपल्या सुचनेनुसार वाढीव तरतुद स्मशानभुमीच्या कामांसाठी करण्यात येईल असे मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

मा.श्रीमती फौजीया खान, राज्यसभा सदस्य, यांनी मातोश्री ग्रामसमृध्दी योजनेसाठी अर्जाची शेवटची तारीख 31.12.2021 ठरविण्यात आली होती ती तारीख एक महिण्यांनी वाढविण्यात यावी तसेच अल्पसंख्यांकाच्या 15 कलमी कार्यक्रमानुसार प्रत्येक विभागाची 15 टक्के तरतुद अल्पसंख्यांकासाठी ठेवण्याचे ठरले होते तसे झाले आहे काय? याची विचारणा केली त्याचप्रमाणे परभणी जिल्हयात वनक्षेत्र कमी असल्यामुळे वनीकरणासाठी जास्त तरतुद करणे आवश्यक आहे असे सांगितले, तसेच मौ.भोगाव ता.जिंतुर येथे नवीन प्राथमीक आरोग्य केंद्र मंजुर झाले आहे. परंतु तेथे जागा उपलब्ध होत नाही त्यामुळे सदरील प्राथमीक आरोग्य केंद्र सांसद आदर्श ग्राम इटोली येथे स्थलांतरीत करण्याबाबत जिल्हा परीषदेने ठराव घेतला आहे त्यानुसार कार्यवाही व्हावी असे सांगितले.

त्यावर मा. आ. श्रीमती मेघनाताई बोर्डीकर, विधानसभा सदस्य, यांनी सदर ठराव हा एकतर्फी घेण्यात आला आहे. भोगाव गावातील लोक प्राथमीक आरोग्य केंद्रास जमीन देण्यास तयार आहेत असे सांगितले. तसेच मौजे इटोलीसाठी वेगळे प्राथमीक आरोग्य केंद्र मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर श्रीमती रोहीणकर, नियोजन समिती सदस्या, यांनी जिल्हा परीषदेमध्ये कामाचे नियोजन करताना सर्व सदस्यांना विश्वासात घेतले जात नाही असे सांगितले.

तसेच श्रीमती अरुणा काळे, जिल्हा नियोजन समिती सदस्या, यांनी आंडगाव प्राथमीक आरोग्य केंद्रासाठी निधी मंजुर करावा अशी मागणी केली.

| अ. क्र. | योजना | कमाल आर्थिक मंजूर नियतव्यय | जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेकरिता कार्यकारी समितीने प्रस्तावित केलेला नियतव्यय |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण) | 18642.90 | 18642.90 |
| 2 | जिल्हा वार्षिक (अनुसूचित जाती उपयोजना) | 6000.00 | 6000.00 |
| 3 | जिल्हा वार्षिक योजना(ओ. टी. एस. पी) | 223.63 | 223.63 |

यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावीत आराखड्यास उपरोक्त प्रमाणे मान्यता देण्याची विनंती केल्यावरुन सन 2022-23 साठीच्या प्रस्तावीत प्रारुप आराखडयास तसेच जिल्हा वार्षिक योजना(अनुसूचित जाती उपयोजना) सन 2022-23 च्या प्रारूप आराखडयास व जिल्हा वार्षिक योजना(ओ. टी. एस. पी) च्या प्रारूप आराखडयास जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्रदान करण्यात आली.

दिनांक 31.07.2021 रोजी घेण्यात आलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील उपस्थित मुदयांचे अनुपालन व कार्यवृत्तांताला मान्यता देण्याचे अनुषंगाने सदस्यांना काही सांगावयाचे असल्यास सांगावे अशी विनंती मा. जिल्हाधिकारी यांनी केली.

त्यावर परभणी शहर मनपा अंतर्गत नाना-नानी पार्क विकसीत करण्यासाठी रू.4.50 कोटी मंजुर करण्यात आले परंतु निविदा केवळ रू.1.50 कोटीची काढण्यात आली आता निधी नाही असे सांगण्यात येत आहे त्यासाठी निधी द्यावा लागेल. मनपा कडील कोणतेही काम पुर्ण होत नाही असे मा.खा.श्री संजय जाधव लोकसभा सदस्य, परभणी यांनी सांगितले.

त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी सदरील काम सन 2015-16 मध्ये सदर कामास मागणी नुसार अर्थसंकल्पित तरतुदीच्या मर्यादेत सदर कामास रु.1.50 ची प्रशासकीय मान्यता प्रदान करुन रु.1.50 कोटी निधी वितरीत करण्यात आला. त्यामुळे सदर कामाचे कुठलेही दायित्व नाही.

श्री. श्रीनिवास मुंढे, जिल्हा नियोजन समिती, सदस्य यांनी परभणी शहरातील शिवाजी पुतळा, डॉ आंबेडकर पुतळा सुशोभीकरण व तिरंगा झेंडा यासाठी निधी मनपाला वितरीत करण्यात आला होता परंतु अद्याप काम सुरु झाले नाही असे सांगितले.

त्यावर आयुक्त परभणी शहर मनपा यांनी या तिनही कामासाठी निविदेची जाहिरात काढण्यात आली होती पंरतु दोन वेळा मुदतवाढ देवुनही निविदा प्राप्त झाल्या नसल्याचे सांगितले. महानगरपालिकेला पैसे देवुन एक वर्ष झाले पण काम होत नाही त्याबाबत मा. पालकमंत्री यांनी ही कामे तात्काळ पुर्ण करावे असे निर्देश दिले.

श्री राजेश फड, जिल्हा नियोजन समिती,सदस्य यांनी मौजे खादगाव ता.गंगाखेड येथे राळेगणसिध्दी व हिवरेबाजारचे धर्तीवर पाणलोट विकासाबाबत प्रशिक्षण केंद्रासाठी निधी देण्याचे आश्वासित करण्यात आले होते परंतु पुढे काही कार्यवाही झाली नाही असे सांगितले. त्यावर सदरील कामासाठी अंदाजपत्रक तयार केले आहे काय?, आराखडा कितीचा झाला आहे? अशी विचारणा केली त्यावर

सुमार रू. 50.00 लक्ष निधी लागणार असल्याचे सांगण्यात आले, त्यावर मा. पालकमंत्री यांनी पुर्नविनियोजनामध्ये याबाबत विचार करु असे सांगितले.

मानव विकास मिशन अंतर्गत जिल्हयास विशेष निधीमधुन रू.9.00 कोटी प्राप्त झाले असुन प्रत्येक तालुक्यास प्रत्येकी रू.1.00 कोटी वितरीत करण्यात आले आहेत. गंगाखेड तालुक्यासाठी वितरीत करण्यात आलेले रू.1.00 कोटी हे महिला बचतगटाचे क्लस्टरसाठी द्यावेत अशी विनंती श्री राजेश फड, जिल्हा नियोजन समिती,सदस्य यांनी केली.
त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी या अनुषंगाने बैठक घेवुन कामाचे आराखडे मागविले आहेत. आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे त्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

श्रीमती अरुणा काळे, जिल्हा नियोजन समिती, सदस्य यांनी महिला बचत गटांसाठी आडगाव बाजार येथे इमारतीची मागणी केली होती त्याबाबत माविमकडे मागणी करण्याबाबत सुचीत करण्यात आले होते परंतु माविमकडुन हे गाव त्याचेकडे येत नसल्यामुळे निधी देता येत नसल्याचे कळविण्यात आले आहे त्यामुळे इतर शिर्षामधुन निधी उपलब्ध करुन दयावा अशी विनंती केली

त्यावर मा. पालकमंत्री महोदयांनी प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना त्यांचेकडुन निधी उपलब्ध करुन देता येईल काय? याबाबत विचारणा केली. त्यावर प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी नवीन पायाभुत सुविधासाठी निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले.

त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी कोकण पश्चीम महाराष्ट्रात सभामंडपांचा वापर बचतगटांचे कार्यालयासाठी करण्यात येतो तसे करणे शक्य आहे काय बाबत तपासणी करण्यात येईल असे सांगितले. सद्यस्थितीमध्ये कोवीड -19 चे प्रादुर्भावाचे स्थितीमुळे वेगळी तरतुद करणे शक्य नाही त्यामुळे कोणत्या ठिकाणी पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येईल याबाबत चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल असे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

त्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी दिनांक 31.07.2021 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त व त्यावरील अनुपालनास मंजुरी देण्याची विनंती केली व त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**ऐनवेळचे विषय –**

मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी परभणी शहरामध्ये गुन्हेगारी मोठया प्रमाणावर वाढली असल्याचे सांगुन तंबाखु गुटखा, ड्रग्जचा वापर अनाधिकृत शस्त्र वापर याबाबी निदर्शनास येत आहेत. त्यासाठी परभणीमध्ये व्यसनमुक्ती केंद्र स्थापीत होणे आवश्यक आहे. तसेच पोलीस प्रशासनाचा दबाव देखील असणे आवश्यक आहे त्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये गुन्हेगारी मुक्त परभणीचा ठराव घेण्याची विनंती केली.

त्यावर मा. पालकमंत्री यांनी पोलीस प्रशासन काय करत आहे? याबाबत विचारणा केली. पोलीस अधिक्षक परभणी यांनी गेल्या वर्षभरात प्रतिबंधात्मक कारवाया, तंबाखु गुटखा बाळगणे, वाळुचोरी इत्यादीबाबत दाखल गुन्ह्यांमध्ये दुपटीपेक्षा वाढ झालेली आहे पोलीस प्रशासन कारवाई करीत आहे असे सांगितले.
त्यावर मा. पालकमंत्री यांनी अशा छोटया मोठया कारवाया करण्यापेक्षा या अवैध धंद्यातील जे मुख्य सुत्रधार आहेत त्यांचेवर कारवाई करावी अशा सुचना दिल्या.

मा. खा.श्री संजय जाधव लोकसभा सदस्य, परभणी व मा.आ.श्री रत्नाकर गुट्टे यांनी पोलीस अधिक्षक यांनी त्यांचे अधिनस्त पोलीस अधिका-यांना काम करण्यासाठी मोकळीक दिली पाहीजे असे सांगितले. तसेच चांगले काम करणा-या अधिका-यांना प्रोत्साहन दिले पाहीजे असे सांगितले. कोवीड-19 च्या प्रादुर्भावामुळे बेरोजगारी वाढली आहे त्यामुळे युवक भरकटले जात असल्यामुळे जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास विभागाकडुन कार्यवाही व्हावी अशी सुचना मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी केली.

सद्यस्थितीमध्ये जिल्ह्यामध्ये दिवसाढवळया मोठया प्रमाणावर चोरीचे प्रकरणे होत आहेत त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे असे सुचविण्यात आल्यावरुन मा.पालकमंत्री यांनी जिल्हयात सी.सी.टी.व्हि. कॅमे-यांचे जाळे तयार करण्यासाठी तसेच स्मार्ट कॅमेरे वापरण्यासाठी लागणा-या निधीचा प्रस्ताव तयार करावा अशा सुचना पोलीस अधिक्षक यांना दिल्या.

त्यावर असे कॅमेरे बसविल्यानंतर त्यांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती व्हावी अशी सुचना करण्यात आली. पोलीस अधिक्षक परभणी यांनी त्याबाबत प्रस्ताव तयार करुन जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात येईल असे सांगितले.

कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी नाविन्यपुर्ण योजनेतुन प्रस्तावीत कामांची माहिती देण्याबाबत सांगितले होते त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत 18.00 कोटी किमतीच्या कामांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते परंतु मागील वर्षाचे दायीत्व वजा जाता नविन कामांसाठी रू.732.33 इतका वाव असल्यामुळे त्यातुन जिल्ह्यामध्ये आगामी काळात होणा-या राष्ट्रीय पातळीवरील कबड्डी स्पर्धेसाठी लागणा-या मॅटचे खरेदीसाठी रू.50.00 लक्षची तरतुद करण्यात आली आहे, तसेच अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाला जमीन मोजणीसाठी लागणा-या रोव्हर मशीनच्या खरेदीसाठी रु.117.35 लक्ष निधीची तरतुद करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच जिल्हा वार्षिक अनुसुचित जाती घटक कार्यक्रम अंतर्गत सन 2021-22 च्या नाविण्यापुर्ण योजनेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी कोवीड विषाणुचे प्रादुर्भावामुळे मृत्यु झालेल्यांचे नातेवाईकांना अनुदानाबाबत माहितीची विचारणा केली होती त्या मुदयाचे अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जिल्ह्यामध्ये एकुण 1301 व्यक्तींचा मृत्यु झाला होता त्यापैकी 394 मृतांचे नातेवाईकांना अनुदान मंजुर करण्यात आले असुन उर्वरीत अनुदान मंजुरीसाठी प्रक्रिया प्रगतीत असल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

जांभुळबेट येथील पर्यटन स्थळाचे ठिकाणी बोटीची आवश्यकता आहे तरी बोटीची व्यवस्था करावी अशी सुचना जिल्हा नियोजन समिती सदस्यांनी केली.

त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले. तसेच जांभुळबेट या ठिकाणी पर्यटन योजने अंतर्गत रु.17 कोटी रुपयांचा विकास कामांचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे तरी सदरील आराखड्याच्या मंजुरीसाठी पाठपुरावा व्हावा अशी विनंती मा.खा.श्री संजय जाधव, लोकसभा सदस्य यांनी केली.

त्यावर मा. पालकमंत्री यांनी प्रस्तावाची प्रत पाठवावी म्हणजे पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगितले.

परभणी येथील शिवाजी उदयान (नाना नानी पार्क) चे काम पुर्ण होण्यासाठी तरतुद करावी लागेल असे मा.,खासदार श्री संजय जाधव यांनी सांगितले. तसेच कामासाठी तत्कालीन पालकमंत्री यांनी रु.4.33 कोटी रुपयांची मान्यता दिली होती तर मग केवळ रू.1.50 कोटीच्या कामासच प्रशासकीय मान्यता का घेण्यात आली? व तेवढाच निधीची मागणी का करण्यात आली? याबाबत रितसर चौकशी व्हावी अशी विनंती देखील करण्यात आली.

त्यावर मा.पालकमंत्री महोदयांनी महानगर पालिका ही स्वायत्त संस्था आहे. त्यांनी उर्वरीत खर्च त्यांचे निधीतुन करावा असे सांगितले.

मा.आ.राहुल पाटील यांनी परभणी ही मराठवाड्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे तेथे मुंबईच्या कस्तुरबा गांधी साथरोग रुग्णालयासारखे रुग्णालय मंजुर करण्याबाबत ठरावा घ्यावा अशी विनंती केली.

त्यावर मा.पालकमंत्री यांनी जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे या विषयी काय मत आहे अशी विचारणा केली.

जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी अशा प्रकारचे रुग्णालय मंजुर करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

त्यावर मा. पालकमंत्री महोदयांनी याबाबत व्यवस्थित अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव तयार करुन सादर करावा. हे काम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतुन होणे शक्य नाही त्यामुळे व्यवस्थित प्रस्ताव शासनास सादर करावा त्याबाबत पाठपुरावा करता येईल असे मा.पालकमंत्री महोदयांनी सांगितले.

महिला रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी वाढीव निधीसाठी पाठपुरावा करावा लागणार आहे कारण प्रस्तावीत वैद्यकीय महाविद्यालयासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा उपलब्ध करुन देवुन जिल्हा सामान्य रुग्णालय तात्पुरते महिला रुग्णालयात स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावीत असल्यामुळे सदरील काम तातडीने पुर्ण करणे आवश्यक आहे असे मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले त्यावर मा. पालकमंत्री महोदयांनी याबाबत बैठक घेवुन अहवाल दया त्याबाबत आमच्या स्तरावरुन पाठपुरावा केला जाईल असे सांगितले.

तुराब-उल-हक दर्ग्याच्या ठिकाणी रहाणे व पाण्याची व्यवस्था नाही ही बाब जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांनी निदर्शनास आणले. सदरील स्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी एक विकास आराखडा तयार करुन तो मंजुरीसाठी सादर करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

इदगाह जमिनीवरील अतिक्रमणे व जिल्हयातील वक्फ जमिनीबाबत मुद्दा मा.आ.बाबाजानी दुर्राणी यांनी उपस्थित केला तर मा आ. सुरेश वरपुडकर यांनी सरकारी दवाखाना ते दर्गा रस्त्याचे कामासाठी रू.20.00 कोटी मंजुर करण्यात आले आहे, परंतु इदगाह मैदानावर अतिक्रमण असल्यामुळे सदरील काम करण्यास अडचण निर्माण होत आहे असे सांगितले.

त्यावर मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी इदगाह मैदानावरील 17 अमिक्रमणधारक दुकानदारांनी अतिक्रमण स्थगिती मिळविली असुन सदरील स्थगिती आदेश रद्द करण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे. एकदा न्यायालयाने स्थगिती उठली की सर्व अतिक्रमणे काढुन टाकण्यात येतील असे सांगण्यात आले.

आयुक्त परभणी शहर मनपा यांनी त्यांचे कालावधीत परभणी शहरातील अतिक्रमणे निष्कासीत करण्याची कोणतीही कार्यवाही हाती घेतली नाही याबाबत पदाधिका-यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच परभणी शहरातील स्वच्छतेसाठी पथकांचे गठण करण्याच्या सुचना पदाधिका-यांनी दिल्या.

मा.आ. रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य गंगाखेड यांनी एम.आय.डी.सी. मध्ये लिमला येथील गजानन शिंदे यांचा एक भुखंड होता त्यांचे भुखंडावर दुस-याने बांधकाम केले परंतु आता ती व्यक्ती स्वत:चा भुखंडही सोडत नाही व अतिक्रमीत भुखंडही सोडत नाही त्याबाबत कार्यवाही व्हावी अशी विनंती केली.

त्यावर मा. पालकमंत्री महोदयांनी सदरील जमिनीची मोजणी करुन प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेवुन तातडीने कार्यवाही करण्याबाबत आयुक्त परभणी शहर मनपा यांना निर्देशीत केले.

वक्फ जमिनीच्या अतिक्रमणे व वक्फ जमिनीबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मा. पालकमंत्री हे सदर खात्याचे मंत्री असल्यामुळे त्यांचे कालावधीत त्यांनी पहिल्यांदाच मंडळाचे गठण केले तसेच पहिल्यांदा पुर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी देखील

नियुक्त केला असल्याचे सांगितले. तसेच परभणी जिल्हयातील वक्फ जमिनीची माहिती सर्व लोकप्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना जिल्हा वक्फ अधिकारी यांना देण्यात येतील असे मा. पालकमंत्री यांनी सांगितले. त्याचप्रमाणे वर्ग-3 जमिनीच्या अधिकार अभिलेखामध्ये देवस्थानचे नाव लावण्याबाबत शासन निर्णय सन 2017 अन्वये निर्देशीत करण्यात आले आहे त्यामुळे जिल्हयातील सर्व वर्ग-3 जमिनींच्या अधिकार अभिलेखांचे मालकी रकान्यात देवस्थानचे नाव लावण्यात आले आहे काय याबाबत खात्री करुन घेण्याबाबत निर्देश मा. पालकमंत्री यांनी दिले, तसेच इदगाह मैदान जमिनीवरील अतिक्रमण धारकांचे अतिक्रमणाबाबत न्यायालयीन स्थगिती आदेश रद्द करुन घेण्याबाबत सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी वर्क बोर्ड यांना देण्यात येतील असेही मा. पालकमंत्री यांनी सांगितले.

दैठणा येथील देवस्थान जमिनीच्या विक्रीबाबत न्यायालयाची स्थगिती असताना संबंधितानी या जमिनीची परस्पर विक्री केली त्याबाबत काय कार्यवाही केली अशी माहिती मा.खा.श्री.संजय जाधव यांनी विचारणा केली असता संबंधितावर गुन्हा दाखल करावा अशा सुचना मा. पालकमंत्री महोदयांनी दिल्या.

वालुर येथील आलमशहा दर्गाच्या विकासासाठी निधी द्यावा अशी मागणी करण्यात आली तसेच सन 2019-20 वर्षात झालेल्या अतिवृष्टीमध्ये वालुर मंडळामध्ये झालेल्या नुकसानीसाठी मंजुर करण्यात आलेला निधी तत्कालीन तहसीलदार यांनी पंचनामे न झाल्यामुळे शासनास समर्पीत केला तो निधी परत मिळावा म्हणुन मागणी करण्यात आली.

सदर मुद्याचे अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी यांनी वालुर मंडळातील नुकसानीबाबत अहवाल सादर करण्यात आले नव्हते व आता सदर निधीची मागणी करुन वितरण करणे शक्य नाही असे सांगितले. वालुर येथील प्राथमीक आरोग्य केंद्राचे बांधकामासाठी देखील निधी उपलब्ध करुन दयावा अशी मागणी करण्यात आली.

त्यावर मा. पालकमंत्री महोदयांनी आरोग्य विभागामार्फत या अनुषंगाने आराखडा तयार करण्यात आला असुन विभागाकडे निधीची मागणी करावी असे सांगितले. त्याचप्रमाणे परभणी तालुक्यातील लोहगाव येथील प्राथमीक आरोग्य केंद्राची मागणी करण्यातआली त्या अनुषंगाने देखील मा. मंत्री महोदयांनी संबंधीत विभागाकडे मागणी करण्याबाबत सुचना दिल्या.

सन 2017-18 मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी अनुदान प्राप्त झाले होते परंतु नंतर कोल्हापुर व त्या शेजारच्या जिल्हयात मोठया प्रमाणावर अतिवृष्टी झाल्यामुळे ते अनुदान या जिल्हयांकडे वळविण्यात आले होते परंतु ते अनुदान प्राप्त झाले नाही तरी ते अनुदान मिळावे यासाठी मागणी करण्यात आली. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी विषय जुना असल्यामुळे माहिती घेवुन कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर मा. पालकमंत्री यांनी कोवीड बाबतची सदयस्थिती सांगण्याच्या सुचना दिल्या.

त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी सदयस्थितीमध्ये जिल्हयात 133 सक्रिय रुग्ण असुन त्यापैकी 105 रुग्ण हे गृह विलगीकरणात, 02 रुग्ण अतिदक्षता विभागात, 07 रुग्ण ऑक्सीजन बेडवर असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात उद्यापासुन नियंत्रण कक्ष कार्यान्वीत करण्यात येत असुन त्यामध्ये 24X7 एक महसुल कर्मचारी व डॉक्टर उपस्थित असणार असल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. नेहमी विचारले जाणारे प्रश्न यांचे एक माहितीपत्र तयार करण्यात आले असुन ते वितरीत करण्यात आले आहे. तसेच होम आयसोलेशन कीट देखील तयार करण्यात येत आहे. तसेच सर्व डि.सी.एच. तयार करण्यात आल्या आहेत. सर्व सी.सी.सी. एक आठवडयात कार्यान्वीत करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील ऑक्सीजन साठवण क्षमतेच्या 80 टक्के ऑक्सीजनची साठवणुक करण्यात आली आहे. 15 ते 18 वयोगटातील 24 टक्के मुलांचे लसीकरण पुर्ण करण्यात आले आहे. बाहेर देशातुन या कालावधीत 157 प्रवासी परभणी जिल्हयात आले असुन त्यासर्वांची आर.टी.पी.सी.आर. चाचणी करण्यात आली आहे व त्यापैकी केवळ 02 व्यक्ती करोना पॉझीटीव्ह असल्याचे आढळुन आले असुन त्यांचे स्वॅब जीनोम सिक्वेन्सींग तपासणीसाठी पुण्यास पाठविण्यात आले आहेत. 18 वर्षावरील 77 टक्के नागरिकांना पहिला डोस व 50 टक्के नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. जिल्हयातील स्थलांतरीतांचा विचार केला असता लशीचा पहिला डोस घेतलेल्या नागरिकांची संख्या 87 टक्के येते. शासनाच्या निर्देशानुसार कडक प्रतिबंधाबाबत आदेश काढण्यात येत आहेत. कोवीड विषाणुचा प्रादुर्भाव नियंत्रीत करण्यासाठी सर्वांचे स्तरावरुन सहकार्य लागणार आहे असे मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले. एक महिण्यामध्ये या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे किती मृत्यु झाले याबाबत मा. खा. फौजीयाखान यांनी विचारणा केली त्यावर तिस-या लाटेमध्ये एकही मृत्यु झाला नसल्याची माहिती मा.जिल्हाधिकारी यांनी दिली.

तसेच विवाह सोहळयातील संख्येवर कसे नियंत्रण ठेवणार याबाबत विचारणा करण्यात आली त्याअनुषंगाने विवाहाबाबत माहिती मिळाल्यानंतर त्या कुटुंबास विवाहापुर्वीच 50 च्या मर्यादेबाबत नोटीस देण्यात येईल व त्यानंतर विवाह सोहळयावर लक्ष ठेवण्यात येईल असे मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

कोवीड लसीकरणाबाबत बोगस प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत मुद्दा मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी उपस्थित केला असता अशी कोणतीही बाब आजपर्यंत निदर्शनास आली नसल्याचे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. त्यावर मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी त्यांना निदर्शनास आलेले प्रकरण पाठवते त्याबाबत चौकशी करा असे सांगितले.

मौ मांडाखळी येथे रोहीत्राची मागणी आहे तेथे रोहीत्रासाठी निधी मंजुर करावा अशी मागणी करण्यात आली त्यावर तसा प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी यांनी सांगितले. एकुण रू.35.00 कोटी किमतीचे प्रस्ताव प्राप्त आहेत परंतु केवळ रू.5.50 कोटी निधीची तरतुद करण्यात आली असेही त्यांनी सांगितले.

काही गावांमध्ये कृषी जोडणीच्या डि पी मधुन गावठाणासाठी विदयुत जोडण्या देण्यात आल्या आहेत त्यामुळे योग्य तो विदयुत दाब मिळत नाही असे मा. आमदार श्री रत्नाकर गुट्टे विधानसभा सदस्य, गंगाखेड यांनी सांगितले तसेच लोकांनी पैसे भरल्यानंतर डि.पी. बसविली व दोन दिवसात ती जळाली तर डि.पी. बदलुन मिळत नाही असेही त्यांनी सांगितले.

त्यावर गावठाण व कृषी जोडण्याचे विलगीकरण करण्यासाठी 350 कोटीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे त्याच प्रमाणे विद्युत देयकातुन प्राप्त होणा-या रकमांच्या 33 टक्के रक्कम गावासाठी व 33 टक्के रक्कम जिल्ह्यासाठी वापरता येते त्यानुसार कामे हाती घेण्यात येतात असेही त्यांनी सांगितले. अंतरवेली येथे 33 के.व्हि.चे उपकेंद्र मंजुरीबाबत प्रगतीचे अनुषंगाने विचारणा करण्यात आली असता अंतरवेली व सेलमोहा येथील विद्युत पुरवठा वेगवेगळा करुन हा प्रश्न सोडविण्यात आला असल्याचे अधिक्षक अभियंता यांनी सांगितले.

इतर मागासप्रवर्गाला निवडणुकीमध्ये आरक्षण मिळाल्याशिवाय यापुढे कोणतीही निवडणुक घेण्यात येवु नये या आशयाचा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला. शासनाची देखील हीच भुमीका असुन त्यासाठी इंम्पेरीकल डाटा तयार करण्याचे काम चालु असल्याचे मा.पालकमंत्री महोदयांनी सांगितले.

पीक विम्याबाबत विचारणा केली असता ज्या शेतक-यांनी तक्रारी केल्या होत्या त्यांना विमा रक्कम देण्यात आली असुन इतर विमाधारकांना पीक कापणी प्रयोगाच्या आधारावर झालेल्या नुकसानीनुसार विमा रकमेचे वाटप माहे एप्रील मे मध्ये करण्यात येणार असल्याचे मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

कारगील युध्दातील शहीद जवानाचे वारसांना जमीन मिळण्यासाठीचा प्रस्तावाबाबत विचारणा करण्यात आली त्यावेळी सदरील प्रस्ताव कुठे रखडला आहे हे तपासुन अहवाल सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

परभणी येथील कृषी विद्यापीठामध्ये सायन्स पार्क मंजुर करण्यासाठी मा.पालकमंत्री महोदयांनी मोठे सहकार्य केले असल्यामुळे त्यांचे अभिनंदनाचा ठराव पारीत करावा, अशी मागणी मा. आ.डॉ.श्री. राहुल पाटील यांनी केली व तसा ठराव पारीत करण्यात आला.

परभणी शहर मनपाला छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यांचे सुशोभीकरण व तिरंगा झेंडा यांचेसाठी दिलेल्या निधीबाबत आढावा बैठक घ्यावी अशा सुचना मा.पालकमंत्री यांनी मा.जिल्हाधिकारी यांना दिल्या.
त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी आढावा घेवुन तसेच स्थळांना भेट देवुन माहिती घेते असे सांगितले.

मा.खा.श्रीमती फौजीया खान यांनी मा.आ.श्री.विप्लव बाजोरीया यांना परभणी जिल्ह्यासाठी त्यांचा स्थानीक विकास कार्यक्रमातुन निधी दयावा असे सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजनेची प्रगती ग्रामीण भागात अत्यंत कमी असल्याचे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी सांगितल्यावरुन त्यामागची कारणे काय आहेत असे विचारणा केली असता ग्रामसेवक सहकार्य करीत नसल्याची बाब समोर आली. तसेच या योजनेमध्ये लाभार्थ्यांची निवड करताना गरीब लाभार्थ्यांस प्रथम घरकुल मंजुर करावयाचे आहे असे सांगण्यात आले. तसेच सेलमोहा येथील ग्रामसेवकाने शासकीय संगणक संच गायब केला आहे असे सांगण्यात आले.

त्यावर जे ग्रामसेवक शासकीय कामे करताना असहकार करतात व शासकीय साहित्याचा गैरवापर करतात त्यांचेवर कार्यवाही करण्याचे निर्देश मा.पालकमंत्री यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. परभणी यांना दिले.

जिल्हा वार्षिक योजना सन 2021-22 या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर 2021 अखेर झालेल्या खर्चास जिल्हा नियोजन समितीने आढावा घेतला तसेच कोव्हीड-19 साठी व कोव्हीड-19 च्या प्रादुर्भावावरील उपाययोजना करण्याकरिता तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांच्या जिल्हास्तरीय आरोग्यविषयक सुविधा बळकटीकरण करीता एकुण 30% पर्यंत निधी वर्ग करुन खर्च करण्यास संदर्भाकित शासन निर्णयान्वये अनुमती देण्यात आली होती. तसेच 30% पर्यतचा निधी पुर्णत: खर्च झालेला असल्यास व कोव्हीड उपाययोजनांसाठी आणखी निधीची आवश्यकता असेल तर 10% पर्यंत अतिरिक्त निधी याप्रमाणे एकूण 40% मर्यादेत रु..90.00 कोटीस कोव्हीड-19 साठी खर्चास जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिली.

ऐनवेळी होणा-या बचतीतुन पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.पालकमंत्री महोदयांचे मान्यतेने करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना प्राधिकार देण्यास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, परभणी यांनी तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबतचा खालील प्रस्ताव सादर केलेला आहे. श्री.हिंगुलांबीका माता देवी मंदिर कारेगाव ता.परभणी व श्री.नाईक बाबासाहेब ज्ञानोबाची समाधी देवस्थान, गौडंगाव ता.गंगाखेड येथिल 'क' वर्ग तिर्थश्रेत्राचा यादीमध्ये समावेश करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

बैठकीचे शेवटी श्री.श्रीनिवास मुंढे यांनी समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांना श्रध्दांजली वाहण्याचा शोक प्रस्ताव मांडला.
त्यानंतर जिल्हा नियोजन अधिकारी यांनी सर्व उपस्थित मा.खासदार, मा.आमदार, सर्व सन्माननिय नामनिर्देशित सदस्य,निवाचीत सदस्य व विशेष निमंत्रित तसेच बैठकीस उपस्थित अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्षांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

(आंचल गोयल,भा.प्र.से)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

**(नवाब मलिक)**
**मंत्री, मंत्री अल्पसंख्यांक विकास व औकाफ,**
**कौशल्य विकास व उदयोजकता, म.रा. तथा**
**पालकमंत्री परभणी जिल्हा**